महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:डब्ल्युइबी-१०२०/सी.आर.२६/२०२१/मा.तं. दिनांक: ९ मार्च, २०२३

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:-** महाराष्ट्र अराजपत्रित गट ब व गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२३ लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेच्या सवलतीबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांच्यावेळी दिव्यांग उमेदवार लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेच्यावेळी लेखनिक तसेच अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ४ मार्च, २०२० रोजी 'दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना' प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात येणाऱ्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केल्यानंतर संबंधित दिव्यांग उमेदवारांनी लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा अनुग्रह भरपाई वेळेची आवश्यकता असल्यास आयोगाकडे संबंधित सर्व कागदपत्रांसह विनंती अर्ज (प्रपत्र-१ अथवा प्रपत्र-२) सादर करुन पूर्व परवानगी घेणे अनिवार्य आहे.

**२.** आयोगामार्फत दिनांक २० जानेवारी, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२३ च्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केलेल्या व लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी विहित नमुन्यातील विनंती अर्ज (प्रपत्र-१ अथवा प्रपत्र-२) तसेच संबंधित कागदपत्रे/प्रमाणपत्रे आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' या सदराखालील 'Upload Documents' या वेबलिंकद्वारे विहित मुदतीत सादर करणे आवश्यक आहे.

**३.** दिव्यांग उमेदवारांनी लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेकरीता सादर करावयाच्या कागदपत्रांबाबत आयोगाच्या संकेतस्थळावरील 'दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना' द्वारे आवश्यक सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसारच संबंधित उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.

**४.** ज्या उमेदवारांनी यापूर्वीच प्रस्तुत परीक्षेसाठी लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेकरीता विहित नमुन्यातील विनंती अर्ज ईमेलद्वारे अथवा इतर मार्गाने आयोगास सादर केले असतील, अशा सर्व उमेदवारांनी पुन्हा ऑनलाईन पद्धतीने उपरोक्त वेबलिंकद्वारे नव्याने विनंती अर्ज सादर करणे आवश्यक आहे. प्रस्तुत वेबलिंक व्यतिरिक्त इतर कोणत्याही मार्गाने सादर करण्यात आलेले विनंती अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**५.** केवळ संबंधित जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर करताना लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेकरीता दावा केला म्हणून उमेदवारांना लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत देय असणार नाही. ऑनलाईन अर्जाद्वारे दावा करुन उमेदवारांनी विहित पध्दतीने आयोगाकडून स्वतंत्र पूर्व परवानगी घेतली असल्यासच लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत देय राहील.

**६.** उपरोक्तप्रमाणे लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेकरीता विनंती अर्ज व संबंधित कागदपत्रे/प्रमाणपत्रे अपलोड करण्याकरीताची वेबलिंक **दिनांक १९ मार्च, २०२३ रोजी २३.५९ पर्यंत** सुरु राहील.

ठिकाण:- मुंबई

सह सचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग